**प्रवाशांना दिलासा** • कोरोनामुळे आरक्षित तिकीट असलेल्या प्रवाशांनाच प्रवासाची परवानगी

# रेल्वेतर्फे मार्च २०२१पर्यंत 30 विशेष उत्सव गाड्यांचा विस्तार



## आजपासून काही रेल्वे गाड्यांचे आरक्षण होणार सुरू

**प्रतिनिधी** | जळगाव

मध्य रेल्वेतर्फे विशेष उत्सव गाड्यांचा विस्तार करण्यात आला आहे. या सर्व विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या अधिक माहितीसाठी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन रेल्वेतर्फे करण्यात आले आहे. या गाड्यांवर केवळ आरक्षित तिकीट असलेल्या प्रवाशांनाच प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

०१११५ डाऊन पुणे-गोरखपूर (प्रत्येक गुरुवार) ४ फेब्रुवारी ते २५ मार्चपर्यंत. ०१११६ अप गोरखपूर-पुणे (प्रत्येक शनिवार) ६ फेब्रुवारी ते २७ मार्चपर्यंत. ०२१३५ डाऊन पुणे-मंडुआडीह (सोमवार) १ फेब्रुवारी ते २९ मार्चपर्यंत. ०२१३६ अप मंडुआडीह-पुणे (बुधवार) ३ फेब्रुवारी ते ३१ मार्चपर्यंत. ०१४०७ डाऊन पुणे-लखनऊ (मंगळवार) २ फेब्रुवारी ते ३० मार्चपर्यंत. ०१४०८ अप लखनऊ-पुणे (गुरुवार) ४ फेब्रुवारी ते १ एप्रिलपर्यंत. ०१०३३ डाऊन पुणे-दरभंगा (बुधवार) ३ मार्च ते ३१ मार्चपर्यंत. ०१०३४

### लोकमान्य टिळक टर्मिनस-मंडुआडीह सुपरफास्ट गाडी

गाडी क्रमांक ०२१६७ डाउन लोकमान्य टिळक टर्मिनस-मंडुआडीह सुपरफास्ट उत्सव विशेष गाडी १ फेब्रुवारीपासून पुढील आदेशापर्यंत धावेल. तर गाडी क्रमांक ०२१६८ अप मंडुआडीह-लोकमान्य टिळक टर्मिनस सुपरफास्ट उत्सव विशेष गाडी २ फेब्रुवारीपासून पुढील आदेशापर्यंत धावेल.

### या गाड्या पूर्ण आरक्षित

०२१६७, ०१०३३, ०१११५, ०१४०७, ०२१३५, ०१२३५, ०१२३६, ०२१५६ ०२०३१, ०१०७९, ०२१०१, ०४१५१ या विशेष गाड्यांसाठी बुकिंग २१ जानेवारीपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर सुरू होणार आहे.

कानपूर (शनिवार) ६ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारीपर्यंत. ०१२३५ अप नागपूर-मडगाव (शुक्रवार) ५

### जिल्ह्यातून शिर्डी अन् शेगावला नियमित प्रवास करणाऱ्यांची संख्या अधिक

# भाविकांसाठी शिर्डी, शेगाव पॅसेंजर गाड्या सुरू करा




**जळगाव** | कोरोनाची लस उपलब्ध झाल्याने तसेच संसर्गही ओसरू लागल्याने शिर्डी व शेगाव रेल्वेने नियमित वारी करणाऱ्यांनी पॅसेंजर गाड्या सुरू करण्याची मागणी केली आहे. जिल्ह्यातून शिर्डी व शेगावला नियमित जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. त्यातच गेल्या काही महिन्यांपासून रेल्वेने केवळ विशेष गाड्या सुरू केल्या आहेत. तसेच आता लस उपलब्ध झाल्याने पॅसेंजर गाड्या सुरू करून शेगाव-शिर्डीला नियमित जाणाऱ्या भाविकांसाठी पॅसेंजर गाडीचा मार्ग खुला करावा, अशी मागणी जिल्ह्यातील भाविकांनी केली आहे. कोरोनामुळे गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यापासून पॅसेंजर गाड्या बंद आहेत. त्यातच शिर्डी व शेगावला नियमित जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. या रेल्वेची पॅसेंजर सेवा बंद असल्याने गेल्या वर्षभरापासून या भाविकांची शिर्डी व शेगावची वारी टळली आहे. जिल्ह्यातूनही या दोन्ही तिर्थक्षेत्री भेट देणाऱ्यांची संख्या मोठी आहे. रेल्वे प्रशासनाने हळूहळू बऱ्याच एक्स्प्रेस गाड्या सुरू केल्या आहेत. मात्र, सर्वसामान्य प्रवाशांना अशा विशेष गाड्यांचे तिकिट काढणे कळत नाही. त्यातच या विशेष गाड्यांचे तिकिटाचे दरही पॅसेंजर गाड्यांचे तुलनेत अधिक असतात. तसेच या विशेष गाड्यांना सर्वच स्थानकांत थांबा नसल्याने पॅसेंजर गाडीच यासाठी सोईस्कर असते. त्यामुळे शेगाव संस्थान व शिर्डीला जाण्यासाठी पॅसेंजर गाड्या सुरू करण्याची मागणी आहे.

### शिर्डी-शेगाव वर्षभरात तीनदा दर्शन ...

*मी वर्षभरात शिर्डीला साई दर्शनासाठी व शेगावला गजानन बाबांच्या दर्शनाला रेल्वेने तीनदा नियमित जात असतो. मात्र, गेल्या वर्षभरापासून या दोन्ही ठिकाणी मला एकदाही जाता आले नाही. रेल्वेने विशेष गाड्या सुरू केल्या; पण त्या खेडोपाडी थांबत नसल्याने अशा गाड्यांचा गावांतील भाविकांना फायदा नाही. तसेच या गाड्या आरक्षित असल्याने त्यांचे तिकीटही काढता येत नाही. तरी रेल्वेने आतातरी पॅसेंजर गाड्या सुरू कराव्यात.*

– **रवी पाटील,** म्हसावद रहिवासी

### हुतात्मा एक्स्प्रेस सुरू

*रेल्वेने आमरावती-मुंबई विशेष गाडी सुरू केली आहे. त्याच धर्तीवर पुणे-भुसावळ हुतात्मा एक्स्प्रेस सुरू करण्यासाठी खान्देश रेल्वे प्रवासी मंच रेल्वेला लवकरच निवेदन देणार आहे. पॅसेंजर रेल्वे सुरू होत नाही, तोवर*